**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/१०६५९७३/२०२४ दिनांक - १५/०६/२०२४

## वाहतुक नियंत्रण अधिसुचना

चिंचवड वाहतुक विभाग हद्दीत बकरी ईद निमीत्त चाफेकर चौक येथील ईदगाह मैदान येथे नमाज पठण करण्याकरीता मोठ्या प्रमाणात नागरीक येत असल्याने ईदगाह मैदानाकडे जाणारी व येणारी वाहतुक पर्यायी रस्त्याने वळविणे आवश्यक आहे.तसेच भोसरी वाहतुक विभागाचे हददीत बकरी ईदचे अनुषंगाने मनपा कडुन अनुकुल चौकाजवळ जे-५६ एमआयडीसी भोसरी येथे तात्पुरते स्वरुपात कत्तलखाना उभारण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी जनावरांची खरेदी, वाहतुक व मांस घेवुन जाण्याकरीता व्यापारी, गि-हाईक व मुश्लिम बांधव आपल्या वाहनांनी सदर ठिकाणी येत असतात. त्यामुळे सदर परीसरात वाहनांची गर्दी होत असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी विशाल गायकवाड, पोलीस उप-आयूक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### चिंचवड वाहतुक विभाग

- मरीआई माता मंदिर ते चाफेकर चौक जाणाया सर्व प्रकारच्या वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे
  - ➢ पर्यायी मार्ग १ :- सदर मार्गावरील वाहतुक एस के एफ कंपनीकडुन डावे बाजुस वळुन अहिंसा चौक मार्गे इच्छित स्थळी जाईल.
  - ➢ पर्यायी मार्ग २ :- सदर मार्गावरील वाहतूक मरीआई माता मंदीरापासून डावे बाजुस वळून अहिंसा चौक मार्गे इच्छितस्थळी जातील.
- चाफेकर चौक ते मरीआई माता मंदिर जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे.
  - ➢ पर्यायी मार्ग १:- सदर मार्गावरील वाहतुक ही चाफेकर चौक जुना जकात नाका कडुन उजवे बाजुस वळुन सेव्हन ऑरेंज हॉस्पीटल मार्गे इच्छित स्थळी जातील.
  - ➢ पर्यायी मार्ग २:- सदर मार्गावरील वाहतुक ही चाफेकर चौक कडुन उजवे बाजुस वळुन अंहिसा चौक कडुन इच्छित स्थळी जाईल.
- बिजली नगर ते चाफेकर चौक जाणाया सर्व प्रकारच्या वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे.
  - ➢ सदर मार्गावरील वाहतुक ही हनुमान मंदिर येथुन डावीकडे वळुन मरीआई माता मंदिर किंवा सेव्हन ऑरेंज हॉस्पीटल कडुन इच्छित स्थळी जातील.

तरी वरील प्रमाणे वाहतुक बदल हा दि.१७/०६/२०२४ रोजी सकाळी ०५.०० ते १३.०० वा. दरम्यान आवश्यकतेनुसार (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन) अथवा वाहतुक सुरळीत होईपर्यंत वाहतुक बदल करण्यात येत असुन नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

### भोसरी वाहतुक विभाग

- अनुकुल चौक ते क्वॉलीटी आईसक्रिम चौक जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेशबंदी करण्यात येत

Scanned with OKEN Scanner

आहे.

➢ पर्यायी मार्ग- सदरची वाहने टेल्को रोडवरील गवळीमाथा/हनुमान मंदीर चौक ते ऑरलीक कंपनी चौक व पुढे क्वालीटी आईसक्रिम चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

वरील प्रमाणे वाहतुक बदल हा दिनांक-१७/०६/२०२४ ते १८/०६/२०२४ रोजी या दोन दिवशी सकाळी ०६.०० वा ते २१.०० वा दरम्यान आवश्यकतेनुसार (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन) अथवा वाहतुक सुरळीत होईपर्यंत वाहतुक बदल करण्यात येत असुन नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **चिंचवड, भोसरी** वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड
२/-सदर ठिकाणी वाहतुक बदलाचे अनुषंगाने योग्य असे बॅरीकेटींग करुन वाहतुक वळविलेचे माहीती फलक बसवावे.